| | | |
|---|---|---|
| MHNG090001872024 | दाखल दिनांक | २३/०१/२०२४ |
| | नोंद दिनांक | २३/०१/२०२४ |
| | न्यायनिर्णय दिनांक | १०/०४/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०२ ०२ १८ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१), सावनेर यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी प्रदिपसिंह पृथ्वीराजसिंह ठाकूर)

(दिनांक १०/०४/२०२६)

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०२/२०२४)** **नि.क्र.०९ लगत**

अपराधः मुंबई मद्यबंदी कायदा, कलम ६५(ख) व ८४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र सरकार तर्फे<br>राज्य उत्पादन शुल्क,<br>भरारी पथक क्र. ०१, नागपूर.** |
| **विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता** | | **श्री. टी. एस. आरगे** |
| **आरोपी** | १. | **रोशन शांताराम ढोबळे,**<br>वय–४२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. पिपळा डाक बंगला, ता. सावनेर,<br>जि. नागपूर. |
| | २. | **सागर श्रावण धोटे,**<br>वय–३० वर्षे, व्यवसाय – मजुरी, |
| | ३. | **किशोर अशोक देवकर,** |

| | | |
|---|---|---|
| | | वय–२६ वर्षे, व्यवसाय – मजुरी, दोघे रा. बोरगाव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. |
| **आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ** | | **श्री. पी. एन. काळे** |

# न्यायनिर्णय

(घोषित आज दिनांक १० माहे एप्रिल, २०२६)

गुन्ह्याचे स्वरुप, अभियोगपक्ष व आरोपींतर्फे प्रतिकथने, पुरावा पाहता व युक्तिवाद ऐकता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष मी पुढील कारणांसह नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक २७/०३/२०२३ रोजी सायंकाळी २१.०० ते २२.०० वाजताच्या सुमारास साईताज ढाबा, सावनेर रोड, दहेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपी क्र. ०१ ने सार्वजनीक ठिकाणी मद्य पिणाऱ्या ईसमांना सेवा पुरवली आणि, त्याद्वारे **महाराष्ट्र मद्यबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ख)** अन्वये अपराध केला ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.०२ व ०३ | |

| | | |
|---|---|---|
| | मद्यधुंद अवस्थेत मिळून आले अथवा अशा ठिकाणी मद्यपान करण्याच्या उद्देशाने उपस्थित होते, त्याद्वारे **महाराष्ट्र मद्यबंदी कायदा, १९४९ चे कलम ८४** अन्वये अपराध केला ? | **नकारार्थी.** |
| ३. | काय आदेश ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणेमिमांसा

***मुद्दा क्र.१ व २ साठीः–***

**०२.** प्रस्तूत प्रकरणात आरोपींवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, दिनांक २७/०३/२०२३ रोजी सायंकाळी २१.०० ते २२.०० वाजताच्या सुमारास साईताज ढाबा, सावनेर रोड, दहेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपी क्र. ०१ ने सार्वजनीक ठिकाणी मद्य पिणाऱ्या ईसमांना सेवा पुरवली आणि आरोपी क्र.०२ व ०३ मद्यधुंद अवस्थेत मिळून आले अथवा अशा ठिकाणी मद्यपान करण्याच्या उद्देशाने उपस्थित मिळून आले.

**०३.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे फिर्यादी तथा दाखल अधिकारी, तपास अधिकारी व ०२ पंच साक्षीदार यांना तपासणेत आले. परंतू दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास साथ दिली नाही. पंच सा.क्र.१ राहूल

प्रल्हाद गडपायले व सा.क्र.०४ प्रदिप चंद्रभान गजभिये यांनी त्यांच्या पुराव्यात पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते, तसेच त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नव्हते, असे कथन केले. पुढे दोन्ही पंच साक्षीदारांना घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता, त्यावरील सही त्यांची असल्याचे मान्य केले, परंतू त्यातील मजकूर मात्र साफ नाकारला. करीता, अभियोग पक्षातर्फे त्यांना उलटतपासाच्या स्वरुपात बरीच उत्तर सूचक प्रश्ने विचारण्यात आली. परंतू त्यातदेखील त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली. करीता, सदर साक्षीदारांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही.

**०४.** फिर्यादी तथा दाखल अधिकारी सा.क्र.०२ प्रकाश चिंधुजी मानकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २७/१०/२०२३ रोजी ते राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.०१, नागपूर येथे जवान पदावर कार्यरत असतांना खबरीकडून माहिती मिळाली की, दहेगाव रंगारी साई ताज ढाब्यावर रात्रीच्या वेळी अवैधरित्या मद्य पिवू देतात, त्यावरुन ते कार्यवाहीसाठी गेले असता तेथे ०२ ईसम मद्य पितांना मिळून आले, त्यानंतर त्यांनी दुय्यम निरिक्षक श्री. खताळ यांना बोलावले, त्यांनी येवून कार्यवाही केली, त्यावेळी त्यांचे ईतर पोलीस कर्मचारीसुध्दा हजर होते. पुढे त्यांनी असे कथन केले की, आरोपींना

अटक केल्यानंतर त्यांच्या वैद्यकीय तपासणीकरीता पाटणसावंगी येथे नेले असता आरोपींनी मद्य पिल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला, त्यामुळे त्यांनी आरोपींना नोटिस देवून सोडून दिले व त्यानंतर कार्यालयात जावून आरोपींविरुध्द फिर्याद (नि.क्रं.P19/PW2) दिली. फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात आरोपींना वैद्यकीय तपासणीसाठी पाटणसावंगी येथे नेल्याची बाब, फिर्यादमध्ये नमूद केली नसल्याचे मान्य केले व ईतर उर्वरीत सूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

०५. तपास अधिकारी सा.क्र.३ अजय बबनराव खताळ यांच्या पुराव्यात असे आले की, दिनांक २७/१०/२०२३ रोजी ते राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.०१, नागपूर येथे दुय्यम निरिक्षक पदावर कार्यरत होते, सदर दिवशी फिर्यादी श्री. प्रकाश मानकर यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील साई ताज ढाब्यावर विनापरवाना अवैधरित्या मद्य पुरवले जाते व काही ईसम तेथे मद्यधुंद अवस्थेत आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी दोन पंचांना कार्यालयात बोलावून सदर बातमी सांगून होणाऱ्या कार्यवाहीच्या पंचनाम्यास पंच म्हणून उपस्थित राहण्यास विनंती केली, पंचांनी समंती दर्शविल्यावरुन ते कार्यालयातील सहकारी व ते शासकीय वाहनाने साई ताज ढाब्याच्या काही अंतरावर वाहन उभे करुन चालत जावून ढाब्याच्या आत

गेले असता, तेथे दोन ग्राहक एका टेबलवर मद्य पितांना आढळले, टेबलजवळ जावून पाहिले असता, एका टेबलवर रॅायल स्टॅग विदेशी मद्यच्या ७५० मिली बॅाटलमधील शिल्लक असलेली ३०० मिली मद्य अंदाजे किमंत रु.४००/- आढळून आली, तसेच मद्य पिण्याच्या दोन ग्लासमध्ये देखील मद्य आढळून आले. त्यावरुन त्यांनी ढाबा व्यवस्थापकास बोलावून त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रोशन ढोबळे असे सांगितले, त्यास मद्य पुरवण्याबाबत शासकीय परवान्याची विचारणा केली असता, ते नसल्याचे त्याने सांगितले, तसेच मद्य पिणाऱ्या ईसमांस त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे सागर श्रावण धोटे व किशोर अशोक देवकर अशी सांगितली, त्यांना देखील मद्य पिण्याच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, तो त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले.

०६. पुढे त्यांनी मद्य पिणाऱ्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता त्यांना पाटणसावंगी येथील ग्रामीण रुग्णालय येथे पाठवले, वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांची तपासणी करुन त्या व्यक्तींनी मद्य सेवन केल्याबाबतचा अहवाल दिला, त्यापूर्वी मुद्देमाल जप्त करुन तसे जप्तीपत्रक (नि.क्रं.P21/PW3) तयार केले आणि मुद्देमाल कार्यालयात जमा केला, घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्रं.P22/PW3) केला असल्याचे सांगितले. त्यानंतर ढाबा मालकाने विना

परवाना मद्य पुरविल्यामुळे तसेच मद्य पिणाऱ्या व्यक्तींकडे परवाना नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द त्यांनी संबंधीत कलमान्वये गुन्हा दाखल केला, आरोपींना सूचनापत्रावर सोडले, तिनही आरोपींचे मोक्यावर जबाब घेतले, सदर गुन्ह्याचा तपास केला, आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले असल्याचे सांगितले. उलटतपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी मान्य केले की, त्यांनी जप्त मुद्देमालापैकी सि.ए.सॅम्पल तपासणीकरीता पाठवले नाही, तसेच पंचांना लेखी सूचनापत्र दिले नाही. तसेच जप्ती पत्रक व घटनास्थळ पंचनाम्यामध्ये साई ताज ढाबा असा उल्लेख नसून साई ताज हॉटेल असा उल्लेख असल्याचे कथन केले.

०७. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या उपरोक्त साक्षीदारांपैकी फिर्यादी प्रकाश मानकर व तपास अधिकारी अजय खताळ यांच्या व्यतिरिक्त ईतर कुठल्याही साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाची भिस्त ही केवळ सदर फिर्यादी व तपासी अधिकारी यांच्या पुराव्यावर अवलंबून आहे. फिर्यादी तसेच तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी क्र.०२ व ०३ हे मद्य पिण्याचा परवाना नसतांना सार्वजनिक ठिकाणी मद्य पिवून आढळून आले असल्याचे कथन केले आहे. याउपर, सदर दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात उपरोक्त आरोपींनी मद्याचे सेवन केले

असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केल्याची बाब नमूद केली आहे. परंतू येथे नमूद करावे वाटते की, कथित घटनेच्या वेळी आरोपी क्र. ०२ व ०३ हे मद्य सेवन करुन होते अथवा मद्याच्या अमंलात होते, ही बाब दर्शविणारा कोणताही वैद्यकीय पुरावा अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आला नाही. त्यामुळे सदर वैद्यकीय पुराव्याअभावी आरोपी क्र. ०२ व ०३ हे मद्य सेवन करुन होते, ही बाब संशयाती सिध्द होत नाही.

०८. याउपर, फिर्यादी व तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात साईताज ढाब्यावर अवैध मद्य पुरवले जात असल्यामुळे तेथे कारवाई केल्याची बाब कथन केली आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार सदर कारवाई वेळी स्वतंत्र पंच सा.क्र.०१ राहूल व सा.क्र.०४ प्रदिप हे हजर होते. परंतू, सदर दोन्ही पंच साक्षीदारांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तसेच जप्ती पंचनामा झाल्याची बाब साफ नाकारली आहे. सबब, स्वतंत्र पंच साक्षीदारांच्या दुजोऱ्या अभावी जप्ती पंचनामा (नि.क्र.P21/PW3) व घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.P22/PW3) हे संशयाती सिध्द होवू शकले नाहीत. सबब, मुद्देमालाची जप्तीच सिध्द न झाल्यामुळे त्याचा संबंध थेट आरोपींशी जोडणे न्यायाचे होणार नाही. त्यामुळे आरोपी क्र. ०१ ने दिनांक २७/०३/२०२३ रोजी सायंकाळी २१.०० ते २२.०० वाजताच्या

सुमारास साईताज ढाबा, सावनेर रोड, दहेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथे सार्वजनीक ठिकाणी मद्य पिणाऱ्या ईसमांना सेवा पुरवली व आरोपी क्र. ०२ व ०३ हे सदर सार्वजनीक ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत मिळून आले, या बाबी सिध्द होत नाही. पंच साक्षीदारांनी पंचनामा नाकारल्यामुळे एकूणच पोलीसांनी घटनास्थळावर छापा टाकल्याच्या घटनेवरच संशय उपस्थित होतो. अभियोग पक्षास पुरेपूर संधी देऊन देखील त्यांनी ईतर स्वतंत्र साक्षीदारांना तपासले नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविणे, न्यायोचीत होणार नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे.

०९. फौजदारी प्रकरणामध्ये सरकार पक्षाने विनाशंका प्रकरण सिध्द करणे आवश्यक असते. या प्रकरणामध्ये अभियोग पक्ष आरोपींवरील आरोप विनाशंका सिध्द करु शकला नाही. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक ७५० मिली क्षमतेची विदेशी रॉयल स्टॅग व्हिस्कीची सिल तुटलेली बॉटल अंदाजे ३०० मिली शिल्लक मद्य, मद्यवासाचे ०२ प्लास्टीक मग्गे व ०६ काचेचे अपिल कालावधीनंतर नाश करणे न्यायोचित होईल. आरोपींनी यापूर्वीच फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वये बंधपत्र व जामिनपत्र नव्याने दिले आहेत. सबब, मी **मुद्दा क्र.१ व २** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे. करीता, मुद्दा क्र.३ च्या

उत्तरादाखल खालील आदेश देत आहेः–

## आदेश

१. आरोपी क्र. १ **रोशन शांताराम ढोबळे**, आरोपी क्र.२, **सागर श्रावण धोटे** व आरोपी क्र. ३ **किशोर अशोक देवकर** यांना **महाराष्ट्र मद्यबंदी कायद्याचे कलम ६५(ख) व ८४** च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये **निर्दोष मुक्त** करण्यात येते.

२. **जप्त मुददेमाल** :– एक ७५० मिली क्षमतेची विदेशी रॉयल स्टॅग व्हिस्कीची सिल तुटलेली बॉटल अंदाजे ३०० मिली शिल्लक मद्य अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांच्याकडे योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावी. तसेच ०२ प्लास्टीक मग्गे व ०६ काचेचे ग्लास मद्यवासाचे यांची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेटवाट लावण्यात यावी.

३. आरोपींचे बंधपत्र व जामिनपत्र रद्द करण्यात येतात.

(खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.04.10 15:06:22 +0530

**(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.१),सावनेर

सावनेर.
दिनांक १०/०४/२०२६

## - : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Misal |
| Court Name | :- | Judicial Magistrate First Class (Court No.1), Saoner |
| Date of decision | :- | 10/04/2026 |
| Order signed by PO. on | :- | 10/04/2026 |
| Order uploaded on | :- | 10/04/2026 |